आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

६ एप्रिल २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा उपलब्ध, खरीप हंगामासाठी राज्याच्या खतांच्या कोट्यात वाढ

- राज्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध, गेल्या महिनाभरात साठेबाजांकडून साडे ३ हजारांपेक्षा जास्त सिलिंडर जप्त

- समान नागरी कायदा आणि एक देश एक निवडणूक अंमलात आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपली, प्रमुख पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

**आणि**

- ३०० कोटी रुपयांपर्यंतचे महामार्ग १ वर्षात पूर्ण करण्याची अट सरकारकडून निश्चित

**<><><><><>**

देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा असल्याची ग्वाही केंद्र सरकारने दिली आहे. देशात डाळींचं उत्पादन गेल्या वर्षीपेक्षा जास्त झालं आहे, जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत फारसे चढ उतार झालेले नाहीत,आणि सरकारचं पुरवठा आणि किमतींवर बारकाईने लक्ष आहे, असं ग्राहक व्यवहार मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव अनुपम मिश्रा यांनी सांगितलं. अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या संयुक्त सचिव सी. शिखा यांनी सांगितलं की, देशात गहू आणि तांदळाचा पुरेसा साठा आहे. एकूण ६०२ लाख टन अन्नधान्य सध्या उपलब्ध आहे, तसंच खाद्यतेलाचा साठाही पुरेसा आहे, असं सांगून त्या म्हणाल्या, की खाद्यतेलाची आयात नेहमीप्रमाणे सुरळीत आहे.

यंदाच्या खरीप हंगामासाठी केंद्र सरकारनं राज्याचा खताचा कोटा ४८ लाख ८० हजार मेट्रीक टन केला आहे. गेल्यावर्षी हा कोटा ४४ लाख ७० हजार टन होता अशी माहिती राज्याचे कृषी संचालक सुनील बोरकर यांनी दिली. एकूण कोट्यापैकी सुमारे ५२ टक्के खतं

राज्यात उपलब्ध आहेत आणि येत्या २ महिन्यात आणखी बफर साठा निर्माण करण्याचे प्रयत्न आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**- - बाइट - सुनील बोरकर, संचालक, कृषी - - -**

**<><><><><>**

राज्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून काळा बाजार, साठेबाजी यावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती राज्याचे रेशन नियंत्रक चंद्रकांत डांगे यांनी आज दिली.

**- - - बाइट - चंद्रकांत डांगे - - - -**

जानेवारी ते मार्च दरम्यान राज्यात पेट्रोल, डिझेल, एलपीजीचा जितका सरासरी पुरवठा होत होता तितकाच पुरवठा सध्याही सुरू असल्याचं त्यांनी आकडेवारीद्वारे स्पष्ट केलं. राज्यातल्या स्थलांतरित मजुरांची संख्या पाहता ५ किलो वजनाच्या अतिरीक्त २५ टक्के सिलिंडरची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. त्याचप्रमाणे ऑटो एलपीजीसाठी पुरवठा कोटा वाढवून द्यायची मागणी केल्याचंही डांगे म्हणाले. ज्या भागात पाइप गॅसची सोय उपलब्ध आहे तिथल्या ग्राहकांनी एलपीजी ऐवजी पाइप गॅसची जोडणी घ्यावी. ३० जूननंतर त्यांना एलपीजी पुरवठा होणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. ग्रामीण भागात रॉकेलच्या पुरवठ्याला सरकारनं प्राधान्य दिलं असून प्रत्येक कुटुंबाला ३ लिटर रॉकेल देण्याचे आदेश सरकारनं दिले आहेत. या आठवड्यात सर्वत्र रॉकेल उपलब्ध होईल, अशी माहिती डांगे यांनी दिली.

गेल्या ५ आठवड्यात १८ कोटी घरांना एलपीजी सिलिंडर पुरवण्यात आले आहेत. गॅस एजन्सी रविवारीही सुरू असून एलपीजी सिलिंडरच्या ऑनलाइन बुकींगचे प्रमाण विक्रमी ९७ टक्क्यांवर पोहोचले असल्याचं पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी सांगितलं. ५ किलो वजनाची सिलिंडरही पुरेशी उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड - सुजाता शर्मा बाइट - -**

**<><><><><>**

समान नागरी कायदा आणि एक देश एक निवडणूक ही भाजपाची दोन कामे अद्याप अपूर्ण असून त्यासाठी मार्ग तयार करण्यात येत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज भाजपाच्या ४७ व्या स्थापनादिनानिमित्त भाजपा कार्यकर्त्यांना दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करत होते. भाजपानंच १९९४ साली पहिल्यांदा महिला

आरक्षणाचा विषय घेतला होता असंही ते म्हणाले. सध्याच्या भाजपाने महिलांना लोकसभेत ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा आणला असून त्याची अंमलबजावणी २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकाच्या आधी केली जाणार असल्याचही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत आज संपली. बारामतीची पोटनिवडणूक ही वैयक्तिक नसून अजित पवार यांच्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाची असल्याची भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अर्ज दाखल करताना व्यक्त केली. काँग्रेसनं बारामतीतून प्रदेश सचिव आकाश मोरे यांचा उमेदवारी अर्ज भरला आहे.

ही निवडणूक बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं. अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी एफआयआर दाखल केला तर बारामती विधानसभा निवडणुकीच्या पोटनिवडणुकीसाठीच्या काँग्रेस उमेदवाराचा अर्ज मागे घेता येईल, असं काँग्रेसनं स्पष्ट केलं आहे. निवडणुकीत राजकीय पक्षाने उमेदवार देणं यात काही चुकीचं नाही. तो त्यांचा निर्णय आणि राजकीय अधिकार आहे, त्यावर फार चर्चा करण्याचं कारण नाही, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली आहे.

राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी भाजपाकडून शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी अर्ज भरला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गोविंद मोकाटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्राजक्त तनपुरे यांची भेट घेतली. त्यानंतर प्राजक्त तनपुरे निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. दोन्ही ठिकाणी नामांकन अर्जांची छाननी उद्या होणार असून अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल आहे. मतदान २३ एप्रिल रोजी तर मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

<><><><><>

राज्यसभेच्या नवनिर्वाचित १९ सदस्यांचा शपथविधी आज झाला. केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, ज्योती वाघमारे, माया इवनाते, रामराव वडकुते या महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या सदस्यांचा त्यात समावेश आहे.

राज्यसभेचे अध्यक्ष या नात्याने उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी सदस्यांना शपथ दिली.

<><><><><>

देशातल्या ३०० कोटी रुपयांपर्यंतच्या महामार्ग प्रकल्पांसाठी एक वर्ष तर ३०१ ते ५०० कोटी रुपये खर्चाच्या रस्ते बांधकाम प्रकल्पांसाठी दीड वर्षांचा पायाभूत बांधकाम कालावधी निश्चित केल्याची माहिती रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिली आहे. त्यापुढच्या म्हणजेच, ५०१ ते दीड हजार कोटी रुपये खर्चाच्या महामार्गांसाठी हा कालावधी २४ महिन्यांचा असेल.  हा कालावधी येत्या ६ मे २०२६रोजी किंवा त्यानंतर ज्या प्रकल्पांसाठी निविदा काढल्या जातील, त्या सर्व राष्ट्रीय महामार्गांसाठी लागू असेल. रस्ते बांधणीत येणाऱ्या भौगोलिक अडचणींचं निराकरण करण्यासाठी अतिरिक्त एक वर्षाचा कालावधी दिला जाईल, असं मंत्रालयाने आपल्या परिपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयानं देशभरातल्या सर्व पोलीस स्थानकांमध्ये सीसीटीव्ही बसवण्या संदर्भात याचिकेच्या सुनावणी दरम्यान केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सचिवांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. देशातल्या अनेक पोलीस स्थानकांमध्ये सीसीटीव्ही नसल्याच्या विविध बातम्यांची दखल घेत सर्वोच्च न्यायालयानं स्वतःहून हा खटला दाखल करुन घेतला आहे.

<><><><><>

राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांवरच्या भटक्या जनावरांच्या उपद्रवावर राबवलेल्या उपाययोजनांबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र तसेच राज्य सरकारांना विचारणा केली आहे. भटकी जनावरे महामार्गावर येऊ नये म्हणून राष्ट्रीय नियमावली तयार  करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी  न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठासमोर सुरु आहे.  अशा गुरांमुळे महामार्गावर होणाऱ्या अपघातांना नुकसान भरपाईची मागणीही या याचिकेत आहे.

<><><><><>

प्लास्टिक बाटल्या किंवा वेष्टनात विकल्या जाणाऱ्या पदार्थांसाठी वैधानिक इशाऱ्यासंदर्भात मद्रास उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये हस्तक्षेप करायला आज

सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. पाणी, मीठ आणि साखर विकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक बाटल्या आणि वेष्टनांवर या खाद्यपदार्थात प्लास्टिकचे सूक्ष्मकण असू शकतात, असा इशारा लिहिण्याचे आदेश मद्रास उच्च न्यायालयाने दिले होते.

//<><><><><>//